" अंतरी पेटवू ज्ञानज्योत "

<u>उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.</u>

जा.क्र. उमवि/५/१८७९ /२०००                                        दिनांक : <u>२/६/२०००</u>

७/६/२०००

प्रति,

मा.अध्यक्ष,

श्रमसाफल्य एज्युकेशन सोसायटी,

अमळनेर, जि.जळगांव.

विषय :- शैक्षणिक वर्ष २००० - २००१ पासून अमळनेर,जि. जळगांव येथे समाजकार्य महाविद्यालय सुरू करणेस परवानगी देणेबावत.

संदर्भ :-१) समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ यांचे पत्र क्र. सीएसडब्ल्यु-१०९६/ १८९६/ प्र.क्र.५२२/सुधार-१, दि. २४ नोव्हेंबर, १९९९

२) आयुक्त, समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शिक्षण /सकाम/ मान्यता/ प्र.७२/१९९९-२०००/का.५ब/५९७, दि.२९/१२/९९

३) या कार्यालयाचे पत्र क्र. उमवि/५/४९५/२०००, दि. ११/२/२०००

महोदय,

अमळनेर, जि. जळगांव येथे समाजकार्य महाविद्यालय सुरू करणेस शासनाने संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाची संलग्नता देण्यासंदर्भात तपासणी करून अहवाल सादर करणेसाठी विद्यापीठाद्वारा संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल विद्यापीठ अधिकार मंडळापुढे विचारार्थ ठेवला असता, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व प्राप्त आदेशावरून आपणांस कळविण्यात येते की, स्थानिक चौकशी समितीच्या अहवालातील खालील अटींच्या पूर्ततेस अधिन राहून आपल्या संस्थेस <u>अमळनेर येथे समाजकार्य महाविद्यालया अंतर्गत बी.एस.डब्ल्यु. व एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रमा</u> <u>अनुक्रमे ४०-४० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.</u> सदर मान्यता एक वर्षाकरिता राहील व सदर मान्यतेचे नुतनीकरण करणे आवश्यक राहील याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

....२....

**अटी :-**

१) प्राचार्य, ग्रंथपाल, शिक्षक व इतर स्टाफ यांची शासन व विद्यापीठ नियमाप्रमाणे त्वरीत नेमणूक करण्यात यावी.

२) समाजकार्य महाविद्यालयासाठी स्वतंत्र इमारतीची त्वरीत व्यवस्था करावी.

३) समाजकार्य महाविद्यालयासाठी आवश्यक बेंचेस व इतर फर्निचर त्वरीत खरेदी करावे.

४) कमीत कमी पंचवीस हजार रूपये किंमतीच्या ग्रंथांची खरेदी करावी.

५) किमान एक संगणक सेट त्वरीत खरेदी करावा.

उपरोक्त अटींची पूर्तता नोव्हेंबर २००० च्या आंत करून तसे विद्यापीठास कळवावे म्हणजे पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

कळावे,

आपला विश्वासू,

उप कुलसचिव (संलग्नता)

सोबत :-स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाची प्रत.

**प्रत माहितीस्तव रवाना :-**

१) मा. संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे.

२) मा. सहसंचालक, जळगांव विभाग, जळगांव.

३) मा. आयुक्त समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

४) विभागीय समाजकल्याण अधिकारी, नाशिक.

५) जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जळगांव.

६) विद्यापीठाचे सर्व मा. विभाग प्रमुख

एसी२ॲक्ट//एसपीएस/पे.नं.३७४/